| महापारेषण | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित<br>मानव संसाधन विभाग<br>फोन नं.(०२२) २६५९८५९५/ २६५९५०००<br>फॅक्स (०२२) २६५९८५८७/२६५९२००१<br>प्रकाशगंगा प्लॉट नं. सी- १९<br>इ-ब्लॉक, ७वा मजला, बांद्रा-कुर्ला-कॉम्प्लेक्स,<br>बांद्रा (पूर्व),मुंबई-४०००५१. |
|---|---|

क्र.मराविपाकं/मासं/पुरस्कार/११४६९ दिनांक :- २७ जुलै, २०१०

# परिपत्रक

**विषय:- अभियंता दिनी महापारेषणच्या उत्कृष्ट अभियंत्यांचा 'गौरव व पुरस्कार योजना'.**

.........

महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने अभियंता दिनाच्या निमित्ताने राज्यातील वीज क्षेत्रात कार्यरत असलेल्या उत्कृष्ट अभियंत्यांना त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गुणगौरव व पुरस्कार देण्याचे ठरविले आहे. त्याकरिता, सदर परिपत्रकाद्वारे महापारेषणच्या अभियंत्यांसाठी गौरव व पुरस्कार योजना घोषित करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत कार्यरत असलेल्या अभियंत्यांचा त्यांच्या उत्तम दर्जाच्या कामगिरीसाठी सन्मान करणे तसेच आपल्या कंपनीचे राज्य पारेषण उपयोगिता (STU), पारेषण परवानाधारक (TL), व राज्य भारप्रेषण (SLDC) अशा तिहेरी भूमिकेतून निर्धारीत ध्येय साध्य करण्यासाठी उल्लेखनिय सहभागाकरिता त्यांना प्रेरित करणे व प्रोत्साहन देणे हा सदर गौरव व पुरस्कार योजनेचा उद्देश आहे.

या योजनेत कंपनीतील अभियंत्यांच्या प्रत्येक संवर्गातील एका अभियंत्याला (कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता) त्याच्या मागील ५ वर्षांतील उल्लेखनीय कामगिरी तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रातील ज्ञान, नेतृत्व व निर्णयक्षमता, आपत्ती व्यवस्थापन, नवीन संकल्पना, तंत्रज्ञानाचा उपयोग, व्यवस्थापकीय कौशल्य इत्यादी निकषांच्या आधारावर मूल्यमापन करुन पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल.

३. **निकष व निवड पद्धती:**

पुरस्कारासाठी पात्र अभियंत्यांची निवड दोन टप्प्यांमध्ये केली जाईल:-

१) सर्व परिमंडळाकडून पुरस्कारासाठी शिफारसपत्र मागविणे. (एप्रिल ते जून)
२) पुरस्कार समितीद्वारे अंतिम निवड. (जुलै ते ऑगस्ट)

४. संबंधित परिमंडळाच्या मुख्य अभियंत्यांकडून पुरस्कारासाठी योग्य अभियंत्यांची (कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता या संवर्गातील प्रत्येकी एक) नामांकने पाठविण्यात येतील. त्यासाठी परिमंडळातील मुख्य अभियंता व अधिक्षक अभियंता यांची उपसमिती नामांकनाचे काम करेल. तसेच, अधिक्षक अभियंता व मुख्य अभियंता या संवर्गांसाठी सांघिक कार्यालयातील सर्व कार्यकारी संचालकांची उपसमिती नामांकनाचे काम

करेल. अभियंत्यांच्या कामगिरी व कौशल्याचे मूल्यमापन करण्यासाठी सोबत जोडलेल्या प्रपत्राद्वारे प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे.

५. परिमंडळ/सांघिक उपसमिती आपल्या कार्यक्षेत्रातील अभियंत्यांच्या कामगिरीचा आढावा घेऊन निकषाप्रमाणे पुरस्कारासाठी पात्र अभियंत्यांचे नामांकन करतील. महापारेषण मध्ये मागील ५ वर्षे कार्यरत असलेले अभियंता या पुरस्कारासाठी त्यांच्या संबंधित मुख्य अभियंत्यांकडे प्रपत्रात थेट अर्ज करु शकतील किंवा विशेष उल्लेखनिय कार्य करणा-या अभियंत्याचे नाव पुरस्कारासाठी प्रस्तावित करु शकतील. अशा प्रपत्रातील सर्व अर्जाची तपासणी व छाननी संबंधित (परिमंडळ/सांघिक) उपसमितीद्वारे करण्यात येईल.

६. सर्व परिमंडळ/सांघिक उपसमितीद्वारा पात्र झालेली नामांकने सांघिक पुरस्कार समितीकडे पाठविण्यात येतील. या समितीमध्ये खालील सदस्य राहतील.

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक – समिती प्रमुख
२) संचालक (संचलन)/(प्रकल्प)/(वित्त) – सदस्य
३) कार्यकारी संचालक (संचलन)/(प्रकल्प)/(मा.सं.)/ (राज्य पारेषण उपयोगिता) – सदस्य
मुख्य अभियंता (मा.सं.वि.) हे समितीचे सचिव म्हणून काम करतील.

७. सांघिक पुरस्कार समितीद्वारा अंतिमतः प्रत्येक संवर्गातील एक अशी कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता स्तरांवरील पात्र अभियंत्याची निवड करुन ती महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात येईल.

८. संबंधित अभियंत्याच्या एकूण कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी १०० गुणांची पध्द्त निर्धारीत करण्यात येत आहे. ज्यामध्ये ८० गुण संबंधित क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान व ऊर्वरीत २० गुण व्यवस्थापकीय कौशल्यावर आधारीत राहतील. त्यासंबंधीचा तपशील खालीलप्रमाणे आहेः-

**अ) तांत्रिक ज्ञान व क्षमता (८० गुण)**

१) पारेषण नियोजन व प्रणाली अभ्यास (Transmission Planning & System Studies)
२) अतिउच्च दाब प्रणाली संचलन व सुव्यवस्था (EHV Operation & Maintenance)
३) अतिउच्च दाब उपकेंद्र व वाहिनी उभारणी (Construction of EHV sub-stn/lines)
४) भार प्रेषण व प्रणाली संचलन (Grid Operation & Load Dispatch)
५) पारेषण सुरक्षा प्रणाली (Protection System)
६) चांचणी व रिले प्रणाली (Testing & Relaying)
७) विद्युत नियामक कार्यपध्द्ती व दरप्रणाली (Regulatory & Tariff)
८) पारेषण क्षेत्रातील नवे तंत्रज्ञान व पध्दती (New Technology & Best Practices)
९) मीटर, स्कॅडा, ऊर्जा अंकेक्षण, संवाद प्रणाली (Metering, SCADA, Energy Accounting, Communication)
१०) उपकेंद्र भू-संपादन, सर्वेक्षण, स्थापत्य कामे व पध्दती (Land Aquisition, S&I, Civil Works)

**ब) व्यवस्थापकीय कौशल्य (२० गुण)**

१) नेतृत्व व कल (Leadership & Attitude)
२) आकस्मिक अपवादात्मक परिस्थितीचा सामना (Exceptional Work/Emergency Handling)
३) गटबांधणी व प्रोत्साहन (Team Building & Motivation)
४) सहकार्य, सहभाग, संकल्पना व सृजन (Innovation, Technology, Sharing of Ideas & Creativity)
५) समस्या सोडवणूक व निर्णयक्षमता (Problem Solving and Decision Making)
६) आर्थिक पैलू व मूल्याची जाणीव (Cost and Economy Awareness)
७) उपलब्ध बळ / सामुग्रीचा प्रभावी वापर (Effective Resources Utilization)
८) वैयक्तिक मुलाखत (Personal Interview)

वरील मूल्यमापनाची गुणपध्दती सोबतच्य प्रपत्रात समाविष्ट करण्यात आली आहे.

सदर परिपत्रक तात्काळ प्रभावाने लागू असून वर नमूद केल्याप्रमाणे पुरस्काराच्या निवड प्रक्रियेसाठी परिमंडळ / सांघिक उपसमिती तसेच सांघिक पुरस्कार समितीचे गठण झाल्याचे समजण्यात येईल.

या वर्षी (२०१०-११) देण्यात येणा-या पुरस्कारासाठी सर्व मुख्य अभियंत्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील अभियंत्यांपैकी निकष पूर्ण करणा-या प्रत्येक संवर्गातील एका अभियंत्याची शिफारस सांघिक कार्यालयास मुख्य अभियंता (मा.सं.वि.) यांच्याकडे **दिनांक १६.०८.२०१० पर्यंत पाठवावी** जेणेकरुन यावर्षीच्या पुरस्काराची अंतिम निवड ३१.०८.२०१० पर्यंत पूर्ण करता येईल.

सदर परिपत्रक मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मंजूरीने जारी करण्यात येत आहे.

सहपत्रः वरीलप्रमाणे

(सपना पुरोहित)
**कार्यकारी संचालक (मा.सं.)**

प्रति,
महापारेषणच्या प्रेषण यादीप्रमाणे

प्रत सविनय सादरः

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण, मुंबई
२) संचालक (संचलन)/(प्रकल्प)/(वित्त), सांघिक कार्यालय, मुंबई

प्रत सस्नेह रवानाः
कार्यकारी संचालक (संचलन)/(प्रकल्प) (एस.टी.यू.) , सांघिक कार्यालय, मुंबई
खाजगी समितीचे, मा. ऊर्जामंत्री, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्या माहितीसाठी

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## उत्कृष्ट अभियंता 'गौरव व पुरस्कार योजना' - प्रपत्र

### A) Personal information (अभियंत्यांची वैयक्तिक माहिती)

Category: JE/AE/DyEE/EE/SE/CE

| संवर्ग - |
|---|
| १) कनिष्ठ अभियंता / उप अभियंता |
| २) सहाय्यक अभियंता |
| ३) उप कार्यकारी अभियंता |
| ४) कार्यकारी अभियंता |
| ५) अधिक्षक अभियंता |
| ६) मुख्य अभियंता |

1) नांव (Name of Engineer)

2) पद (Designation)

3) भविष्य निधी क्र. ((Employee (CPF) No.)

4) कार्यालय व ठिकाण (Place of Working)

जन्म तारीख
6) Date of Birth
/ /

रुजू झाल्याची तारीख
7) Date of Joining in Organization:
/ /

सध्याच्या पदावर रुजू झाल्याची तारीख
8) Date of Joining in Present Post
/ /

### B) मागील ५ वर्षातील कामगिरीचा आढावा (Performance/Achievements in last 5 years)

| SN | Year | Place of working/ Post Held | Significant Achievement Description | Supporting Documents | Remark |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वर्ष | पद व कामाचे ठिकाण | उल्लेखनीय कामगिरीचे वर्णन | जोडलेली कागदपत्रे / टिपणी | शेरा |
| 1 | 2009-10 | | 1)<br>2) | | |
| 2 | 2008-09 | | 3)<br>4) | | |
| 3 | 2007-08 | | 5)<br>6) | | |
| 4 | 2006-07 | | 7)<br>8) | | |
| 5 | 2005-06 | | 9)<br>10) | | |

**Note:** Applicant may attach Self Content Note about the achievements if required.
**टिप : आवश्यक असल्यास वेगळी टिपणी जोडावी.**

**Declaration:** I hereby declare that the information stated above is true to the best of my knowledge and I am aware that this information is submitted for the purpose of Best Engineers Award.

**दिनांक:**

**Date:**

**Signature of the Applicant**
**(स्वाक्षरी)**

परिमंडळ / सांघिक उपसमितीद्वारे मूल्यांकन

## C) Overall Assessment of the Performance by Zonal/Corporate Sub-Committee

| SN | Observed Qualities / Skills | Maximum Marks | Valuation | Remark |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | आढळलेले गुण / कौशल्य | एकूण गुण | मूल्यांकन | शेरा |
| **A)** | **तांत्रिक ज्ञान (Technical Competency in Knowledge Areas)** | **80** | | |
| 1 | Transmission Planning and System Studies | | | |
| 2 | EHV Operation & Maintenance | | | |
| 3 | Construction of EHV Sub-Station / Lines | | | |
| 4 | Grid Operation and Load Dispatch | | | |
| 5 | Protection Systems | | | |
| 6 | Testing & Relaying | | | |
| 7 | Regulatory / Tariff | | | |
| 8 | New Technology in Transmission (Facts / WAMS / Smart Grid) & Best Practices in O&M / Construction | | | |
| 9 | Metering, SCADA, Energy Accounting, Communication Technologies. | | | |
| 10 | Land Acquisition / Survey & Investigation (S&I) / Civil Works in Project & Best Practices | | | |
| | | | | |
| **B)** | **व्यवस्थापकीय कौशल्य (Managerial Skills)** | **20** | | |
| 1 | Leadership and Attitude | | | |
| 2 | Exceptional Approach to work/Emergency | | | |
| 3 | Team Building & Motivation | | | |
| 4 | Innovation, Technology, Sharing of Ideas & | | | |
| 5 | Problem Solving and Crutial Issues | | | |
| 6 | Cost and Economy Awareness | | | |
| 7 | Effective Resources Utilization and Decision | | | |
| 8 | Personal Interview | | | |
| | **Total** | **100** | | |

## D) इतर तपासणी (Other Clearences)

1) Any Disciplinary Action in Process or Pending YES / NO

2) Recommendation of Sub-Committee:

**उपसमिती प्रमुख**

**(Zonal/Corporate) Sub-Committee Head**
**Chief Engineer/Executive Director**

**सांघिक पुरस्कार समितीचे मूल्यमापन**

## E) Evaluation by Corporate Award Committee (CAC)

ACR Rating of Last 5 years: 1) 2) 3) 4) 5) Total

Disciplinary Action :- **YES / NO**

Recommendation:-

**सांघिक पुरस्कार समिती सचिव**

**(CAC Secretary)**
**Chief Engineer (HRD)**